VOL- VIII ISSUE- VIII AUGUST 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# निवड आधारित श्रेयांक पद्धतीची अंमलबजावणी करण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचना

**प्रा.डॉ. शोभना वि. जोशी[1] प्रविण म. पाथरकर[2]**
[1]विभाग प्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
[2]पीएच.डी. संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना**:

भारतातील उच्च शिक्षण प्रणालीमध्ये समानता, कार्यक्षमता आणि उत्कृष्टता आणण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) अनेक उपाय योजना सुरू केल्या आहेत. उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी नवीन अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, परीक्षा आणि मूल्यमापन प्रणाली आणि इतर बाबींमध्ये महत्वाच्या सुधारणांचा अंतर्भाव आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने भारतातील उच्च शिक्षण प्रणालीमध्ये सुधारासाठी आणि उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थामध्ये किमान निकष आणि गुणवत्ता राखण्यासाठी वेळोवेळी विविध नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत. अलिकडच्या काळात विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या शैक्षणिक सुधारणांमुळे एकंदरीत उच्च शिक्षण प्रणालीत अनेक सुधारणा झाल्या आहेत. तथापि, आपल्या उच्च शिक्षण प्रणालीमध्ये बरीच विविधता असल्याने त्यादृष्टीने परीक्षा, मूल्यमापन आणि श्रेणी प्रदान करण्याच्या अनेक पध्दतीची अंमलबजावणी विद्यापीठे करत आहेत. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांना अभ्यासक्रम आणि अध्ययन-अध्यापन पद्धतींमध्ये उत्तम समन्वय साधुन परीक्षा आणि मूल्यमापन पद्धतींची रचना करण्यासाठी स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीच्या आधारे श्रेणी प्रदान करण्यासाठी एका योग्य प्रणाली तयार करण्याची आवश्यकता आहे. परंतु सध्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीचा अहवाल परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे मूल्यमापनाच्या पारंपारिक प्रणालीचा वापर करून, श्रेणी प्रदान करून किंवा दोन्ही पध्दती वापरुन नोंदविला जातो. संपुर्ण देशातील उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये गुणांचे नामांकन श्रेणीमध्ये रूपांतर करण्याच्या पद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात वैविध्य आढळते. त्यामुळे वेगवेगळ्या विद्यापीठामधून व महाविद्यालयांमधून पदवीधर होणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगिरी समजून घेण्यासाठी आणि त्यांचे अनुमान काढण्यासाठी संबंधित यंत्रणेस अडचण निर्माण होते.

पारंपारिक गुण प्रणालीपेक्षा श्रेणी आधारित पद्धती अधिक चांगली मानली जाते आणि म्हणूनच भारतातील सर्वोत्तम शैक्षणिक संस्था तसेच परदेशातही तिचा अवलंब केला जात आहे. म्हणूनच विविध विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये एकसमान श्रेणी पद्धती लागू करणे इष्ट आहे. त्यामुळे देशभरातील आणि परदेशातील संस्थांमध्ये विद्यार्थ्यांची गतिशीलता सुलभ होईल आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीचे मूल्यमापन करण्यास संबंधित यंत्रणा सक्षम होतील. विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील शैक्षणिक कामगिरीचे संकलित श्रेणी बिंदु सरासरी (सीजीपीए) वर आधारित मूल्यमापन पद्धतीमध्ये आणि

मापनात समानता आणण्यासाठी कांही दिशानिर्देश तयार केले आहेत.

**श्रेणी पद्धतीचे उपयोजन:**

विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेले हे दिशानिर्देश भारतातील केंद्रिय, राज्य आणि अभिमत विद्यापीठा अंतर्गत सर्व पदवी आणि पदव्युत्तर पदवी, पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रमांना लागू असतील.

**प्रमुख शब्दांच्या व्याख्याः**

१. **सत्र (Semester) :** प्रत्येक सत्रात १५ ते १८ आठवड्यांच्या शैक्षणिक कार्याचा समावेश असेल जो ९० वास्तविक अध्यापन दिवसा इतका असेल. 'विषम' सत्र जुलै ते डिसेंबर आणि 'सम' सत्र जानेवारी ते जून या कालावधीत आयोजित केले जाऊ शकते.

२. **शैक्षणिक वर्ष (Academic Year) :** सलग दोन सत्र (एक विषम + एक सम) म्हणजे एक शैक्षणिक वर्ष होय.

३. **निवड आधारित श्रेयांक पद्धती (Choice Based Credit System) :** विद्यार्थ्यांना विहित अभ्यासक्रमामधून आवडीचा अभ्यासक्रम/विषय निवडण्याची संधी निवड आधारित श्रेयांक पद्धती प्रदान करते.

४. **अभ्यासक्रम (Course) :** सहसा 'विषय' हा एखादया अभ्यासक्रमाचा घटक असतो. सर्व अभ्यासक्रम समान भारांशाचे आसण्याची आवश्यकता नाही. अभ्यासक्रमांनी शिक्षणाची उद्दीष्टे आणि अध्ययन निष्पत्ती निश्चित केल्या पाहिजेत. अभ्यासक्रमामध्ये व्याख्याने/ स्वाध्याय/ प्रयोगशाळेतील कार्य/ क्षेत्रिय कार्य/ उपक्रम/ प्रकल्प/ व्यावसायिक प्रशिक्षण/ सेमिनार/ सत्र परीक्षा/ मौखिक परीक्षा/ असाइनमेंट्स/ सादरीकरणे/ स्वयं-अभ्यास इ. किंवा यापैकी काहीचे संयोजन असावे.

५. **श्रेणी आधारित सत्र पद्धती (Credit Based Semester System) :** श्रेणी आधारित सत्र पद्धतीमध्ये अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी निर्धारित केलेल्या श्रेयांकाच्या संख्येनुसार विद्यार्थ्यांद्वारे किती श्रेयांक प्राप्त केले आहेत त्यानुसार पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्र प्रदान केले जाते.

६. **श्रेयांक बिंदु (Credit Point) :** श्रेयांक बिंदु म्हणजे अभ्यासक्रमासाठी श्रेणी बिंदु आणि श्रेयांकाची संख्या होय.

७. **श्रेयांक (Credit) :** हे अभ्यासक्रमाचे मापन करण्याचे एकक आहे. हे दर आठवड्याला आवश्यक अध्यापनाच्या तासांची संख्या निश्चित करते. एक श्रेयांक म्हणजे प्रत्येक आठवड्याला एका तासाचे अध्यापन (व्याख्यान/ स्वाध्याय) किंवा दोन तास प्रात्यक्षिक/ क्षेत्रिय कार्य होय.

८. **संकलित श्रेणी बिंदु सरासरी (Cumulative Grade Point Average) :** सर्व सत्रांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरी हे एकूणच संकलित मापन आहे. विद्यार्थ्यांनी सर्व सत्रांमधील विविध विषयामध्ये प्राप्त केलेले श्रेयांक आणि सर्व सत्रांच्या सर्व विषयांच्या एकुण श्रेयांकांची बेरीज यांचे गुणोत्तर म्हणजे संकलित श्रेणी बिंदु सरासरी (सीजीपीए) होय. हे दोन दशांश स्थानांपर्यंत दर्शविले जाते.

९. **श्रेणी बिंदु (Grade Point) :** हा प्रत्येक नामांकन श्रेणीला १०-बिंदू पट्टीवर दिला जाणारा एक संख्यात्मक भार आहे.

१०. **नामांकन श्रेणी (Letter Grade) :** हि एक विद्यार्थ्यांनी केलेल्या शैक्षणिक कामगिरीची अनुक्रमणिका आहे. या श्रेणी ओ, ए+, ए, बी+, बी, सी, पी आणि एफ या अक्षरांनी दर्शवितात.

११. **अभ्यासक्रम:** पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्र प्रदान करण्यासाठीचा एक शैक्षणिक कार्यक्रम.

१२. **सत्र श्रेणी बिंदु सरासरी (Semester Grade Point Average) :** विद्यार्थ्यांनी एका सत्रामध्ये केलेल्या शैक्षणिक कामगिरीचे हे मापन आहे. विद्यार्थ्यांनी विविध सत्रामध्ये नोंदणीकृत विषयांमध्ये प्राप्त केलेले एकूण श्रेयांक आणि त्या सत्रात ठेवण्यात आलेले अभ्यासक्रमाचे

एकूण श्रेयांक बिंदूंचे गुणोत्तर असते. हे दोन दशांश स्थानापर्यंत दर्शविले जाते.

१३. **दाखला, श्रेणी पत्र किंवा प्रमाणपत्र** : प्रत्येक सत्राच्यानंतर सर्व नोंदणीकृत विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या श्रेणीच्या आधारावर प्रमाणपत्र दिले जाईल. श्रेणी प्रमाणपत्रावर अभ्यासक्रमाचा तपशील (सांकेतांक, शीर्षक, एकुण श्रेयांकांची संख्या, प्राप्त श्रेयांक) त्याबरोबरच सत्राचा सत्र श्रेणी बिंदु सरासरी (एसजीपीए) आणि संकलित श्रेणी बिंदु सरासरी (सीजीपीए) नोंदविलेला असेल.

**सत्र प्रणाली आणि निवड आधारित श्रेयांक पद्धती:**

भारतीय उच्च शिक्षण संस्था परंपरागत वार्षिक प्रणाली पासून सत्र प्रणालीकडे वाटचाल करीत आहे. सध्या बऱ्याच संस्थानी निवड आधारित श्रेयांक पद्धतीची अगोदरच अंमलबजावणी सुरू केली आहे. सत्र प्रणाली हि अध्ययन-अध्यापनाच्या प्रक्रियेस गती देण्याबरोबरच अध्ययनाच्या सर्व बाजुना गतिशीलता प्रदान करते. निवड आधारित श्रेयांक पद्धती अभ्यासक्रमाचा आशय आणि अध्यापनाचे तास यावर आधारित अभ्यासक्रमाची रचना करण्यात आणि श्रेयांक देण्यात लवचिकता प्रदान करते. निवड आधारित श्रेयांक पद्धतीमध्ये एक 'कॅफेटेरिया' प्रकारचा दृष्टीकोन आहे. जिथे विद्यार्थी त्यांच्या आवडीचे अभ्यासक्रम/विषय घेऊन ते त्यांच्या गतीने शिकू शकतात, अतिरिक्त अभ्यासक्रम/विषय घेवुन आवश्यक श्रेयांकापेक्षा जास्तीचे श्रेयांक प्राप्त करतात आणि आंतर-विद्याशाखीय दृष्टीकोन स्वीकारतात. सर्व उच्च शिक्षण संस्थांनी निवड आधारित श्रेयांक पद्धतीचा स्वीकार करून श्रेणी पद्धतीची अंमलबजावणी करणे इष्ट आहे.

**अभ्यासक्रम/विषयाचे प्रकारः**

अभ्यासक्रम/विषयाचे तीन प्रकार: मुख्य, वैकल्पिक आणि पायाभूत

१. **मुख्य अभ्यासक्रम/विषय** : प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्येक सत्रात अनिवार्यपणे मुख्य अभ्यासक्रम/विषय पुर्ण करणे हि त्या अभ्यासक्रमाची आवश्यकता आहे.

२. **वैकल्पिक अभ्यासक्रम/विषय** : विद्यार्थी वैकल्पिक अभ्यासक्रम/विषय खालील पद्धतीने निवडू शकतो:

- विद्यार्थी ज्या अभ्यासक्रमाचा अभ्यास करत आहे त्यास सहाय्यभूत ठरणारा
- विस्तारित व्याप्ती प्रदान करणारा
- इतर शाखांशी संबंध प्रस्थापित करण्यास सक्षम असणारा
- विद्यार्थ्यांची कौशल्य विकसित करणारा

वैकल्पिक अभ्यासक्रम/विषय हा "सामान्य" आणि "मुक्त" वैकल्पिक" अशा दोन पद्धतीचा असतो. विद्यार्थ्यांमध्ये सामान्य कौशल्य विकसित करणारा "सामान्य वैकल्पिक" आणि विद्याशाखा केंद्रित किंवा विद्याशाखेशी संबंधित नसलेला "मुक्त वैकल्पिक" होय.

३. **पायाभुत अभ्यासक्रम/विषय** : पायाभुत अभ्यासक्रम/विषय अनिवार्य आणि वैकल्पिक असे दोन प्रकारचे असू शकतात. अनिवार्य पायाभुत अभ्यासक्रम/विषय हा "आशयज्ञान अभिवृद्धी" आधारित सर्व विद्याशाखांसाठी अनिवार्य आहेत. तर वैकल्पिक पायाभुत अभ्यासक्रम/विषय "माणुस घडविणारे शिक्षण" हे उद्दीष्ट असलेले मूल्य-आधारित आहेत.

**परीक्षा आणि मूल्यमापन :**

उच्च शिक्षण संस्था अभ्यासक्रमांना त्यांच्या संबंधित संवैधानिक संस्थांनी मंजूर केल्याप्रमाणे सध्या परीक्षा आणि मूल्यमापनाच्या विविध पद्धतीचा अवलंब करत आहेत. सत्र, मध्य सत्र, अंतिम सत्र या विविध टप्प्यावार घेण्यात येणाऱ्या परीक्षांमधील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीचे पारंपारिक पद्धतीने म्हणजे गुणांच्या आधारे मूल्यमापन केले जाते. काही उच्च शिक्षण संस्था गुणांचे संबधित श्रेणी पद्धतीच्या आधारावर नामांकन श्रेणीमध्ये रुपांतर करतात आणि श्रेणी प्रदान करतात. महाविद्यालये आणि विद्यापीठे अवलंब करीत असलेल्या श्रेणीची संख्या, श्रेणी बिंदु, नामांकन श्रेणी इत्यादीबाबत वैविध्य आहे, त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात. म्हणुन विद्यापीठ अनुदान

आयोगाने सत्र आधारित श्रेयांक पद्धतीवर (एसबीसीएस) आधारित श्रेणी आणि संकलित श्रेणी बिंदु सरासरी (सीजीपीए) ची शिफारस केली आहे.

**१. नामांकन श्रेणी आणि श्रेणी गुण:**

श्रेणी प्रदान करण्याच्या संबंधित श्रेणी (Relative Grading) आणि परिपूर्ण श्रेणी (Absolute Grading) या दोन पद्धती प्रचलित आहेत.

**अ) संबंधित श्रेणी (Relative Grading):** संबंधित श्रेणी अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांनी मिळविलेले एकूण गुणांपैकी प्राप्त गुण किंवा शततमकाच्या आधारे दिली जाते.

**ब) परिपूर्ण श्रेणी (Absolute Grading) :** परिपूर्ण श्रेणी अंतर्गत व प्राप्त गुण पूर्व-निर्धारित वर्गांतराच्या आधारावर श्रेणीमध्ये रुपांतरित केले जातात.

1. महाविद्यालये आणि विद्यापीठे वरीलपैकी कोणत्याही एका पद्धतीची अंमलबजावणी करू शकतात.
2. विद्यापीठ अनुदान आयोग १०-बिंदू श्रेणी पद्धतीची नामांकन श्रेणीसह खालीलप्रमाणे शिफारस करते:

| नामांकन श्रेणी | श्रेणी बिंदु |
|---|---|
| ओ (अत्यंत उत्कृष्ट) | १० |
| ए + (उत्कृष्ट) | ९ |
| ए (खूप चांगले) | ८ |
| बी + (चांगले) | ७ |
| बी (सरासरी पेक्षा अधिक) | ६ |
| सी (सरासरी) | ५ |
| पी (उत्तीर्ण) | ४ |
| फ (अनुत्तीर्ण) | 0 |
| एबी (अनुपस्थित) | 0 |

३. परीक्षेत 'फ' श्रेणी मिळविणारे विद्यार्थी अनुत्तीर्ण होतील आणि त्यांना पुन्हा परीक्षा देणे बंधनकारक असेल.

४. श्रेयांक नसलेल्या अभ्यासक्रम/विषयांसाठी नामांकन श्रेणीऐवजी 'समाधानकारक' किंवा 'असमाधानकारक' असे निर्देशित केले जाईल आणि हे सत्र श्रेणी बिंदु सरासरी (एसजीपीए) किंवा संकलित श्रेणी बिंदु सरासरी (सीजीपीए) च्या मापनासाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

५. अभ्यासक्रमामध्ये उत्तीर्ण होण्यासाठीची श्रेणी किंवा गुणांची टक्केवारी यावर विद्यापीठे निर्णय घेऊ शकतात. तसेच संवैधानिक व्यावसायिक परिषदेच्या (एनसीटीई, एआयसीटीई, बीसीआय, एमसीआय, पीसीआय, आरसीआय इ.) शिफारशीनुसार आवश्यक संकलित श्रेणी बिंदु सरासरी (सीजीपीए) नुसार अभ्यासक्रमाची पदवी प्रदान करू शकतात.

६. विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापक म्हणून प्रवेश करण्यासाठी कला, विज्ञान, वाणिज्य इ. संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी खुल्या संवर्गातील उमेदवारासाठी किमान ५५% आणि आरक्षित संवर्गातील उमेदवारासाठी किमान ५०% गुण असणे आवश्यक आहे. सामान्य श्रेयांक पद्धतीनुसार (Absolute Grading) 'ब' श्रेणीसाठी किमान ५०% आणि 'ब+' श्रेणीसाठी किमान ५५% पेक्षा कमी गुण असू नयेत अशी शिफारस केली आहे. 'ब' आणि 'ब+' श्रेणी संबंधीचे निर्देश संवैधानिक व्यावसायिक परिषदेच्या (एनसीटीई, एआयसीटीई, बीसीआय, एमसीआय, पीसीआय, आरसीआय इ.) शिफारशीनुसार निश्चित करावेत.

**मूल्यमापनामध्ये निष्पक्षता:**

मूल्यमापन हे शिक्षणाच्या व्यवस्थेचा अविभाज्य भाग आहे. एखाद्या विद्यार्थ्यांद्वारे प्राप्त केलेल्या शैक्षणिक मानकांचे प्रमाणीकरण करण्यासाठी आणि ते प्रदर्शित करण्यासाठी ते महत्त्वपूर्ण ठरते. ते विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीचे निर्देशक असते. त्यामुळे हि सर्व प्रक्रिया निष्पक्षपाने पार पाडणे हे विद्यापीठाचे कर्तव्य आहे. परीक्षा आणि मूल्यमापनाची प्रक्रिया प्रभावी आणि प्रामाणिकपणे पुर्ण करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने खालील निर्देश दिले आहेत.

१. जर संपुर्ण विद्याशाखेच्या विविध अभ्यासक्रमामध्ये कमीतकमी ५०% मुख्य विषय (Core Course) उपलब्ध आहेत. अशावेळी सत्राच्या शेवटी सैद्धांतिक घटकाच्या परीक्षाचे आयोजन व मूल्यमापन करण्यासाठी विद्यापीठ क्षेत्राबाहेरील बाह्य परीक्षकांची नेमणुक सक्षम प्राधिकरणाद्वारे केली जाऊ शकते. अशा अभ्यासक्रमांमध्ये प्रश्नपत्रिका निश्चित करणे आणि मूल्यमापन करणे हि दोन्ही कामे बाह्य परीक्षकांकडून केल्या जातील.

२. अशा अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी ५०-५०% आधारावर परीक्षकांच्या समितीची नेमणूक करावी. म्हणजेच प्रात्यक्षिक कार्याची परीक्षा घेण्यासाठी निम्मे परीक्षक विद्यापीठाच्या बाहेरून निमंत्रित करावेत.

३. प्रकल्प अहवाल/प्रबंध /शोध निबंध इत्यादींचे मूल्यमापन अंतर्गत तसेच बाह्य परीक्षकांनी केले पाहिजे.

**सत्र श्रेणी बिंदु सरासरी (एसजीपीए) आणि संकलित श्रेणी बिंदु सरासरी (सीजीपीए) मापन :**

सत्र श्रेणी बिंदु सरासरी (एसजीपीए) आणि संकलित श्रेणी बिंदु सरासरी (सीजीपीए) यांची गणना करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग पुढील प्रक्रियेची शिफारस करते:

**अ)** सत्र श्रेणी बिंदु सरासरी (एसजीपीए) हे विद्यार्थ्यांनी घेतलेल्या सर्व विषयांमध्ये त्याने प्राप्त केलेल्या श्रेणी बिंदुसह श्रेयांकाच्या संख्येच्या बेरीजचे गुणोत्तर आहे.

SGPA (Si) = Σ (Ci x Gi) ÷ ΣCi

Ci - अभ्यासक्रमाच्या श्रेयांकांची संख्या

Gi - विद्यार्थ्याने प्राप्त केलेले श्रेणी बिंदु

**ब)** संकलित श्रेणी बिंदु सरासरी (सीजीपीए) चेही मापन त्याच पद्धतीने केली जाते. एका अभ्यासक्रमाच्या सर्व सत्रामध्ये विद्यार्थ्यांद्वारे केलेली संपुर्ण शैक्षणिक कामगिरी

CGPA = Σ (Ci x Si) ÷ ΣCi

Si - त्या सत्राचा एसजीपीए

Ci - त्या सत्रातील एकुन श्रेयांकांची संख्या

**क)** सत्र श्रेणी बिंदु सरासरी (एसजीपीए) आणि संकलित श्रेणी बिंदु सरासरी (सीजीपीए) चे दोन दशांश गुण असतील.

**प्रमाणपत्र / दाखला (स्वरूप) :**

नामांकन श्रेणी, श्रेणी बिंदु, सत्र श्रेणी बिंदु सरासरी (एसजीपीए) आणि संकलित श्रेणी बिंदु सरासरी (सीजीपीए) यावर आधारित शिफारशीनुसार उच्च शिक्षण संस्थानी प्रत्येक सत्राची शैक्षणिक कामगिरी तसेच एकुण सर्व सत्रांची एकत्रित शैक्षणिक कामगिरी दर्शविणारे प्रमाणपत्र/दाखला विद्यार्थ्याला प्रदान करावा.

**समारोप :**

संपूर्ण भारतीय शिक्षण व्यवस्थेत अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन पद्धती, अध्ययन निष्पत्ती, मूल्यमापन प्रक्रिया इत्यादीमध्ये एकरूपता व समानता आणण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने निवड आधारित श्रेयांक प्रणालीची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व उच्च शिक्षण संस्थांना अशाप्रकारचे दिशानिर्देश दिले आहेत.

**संदर्भ सूची :**

1. U.G.C. Guidelines on Adaptation of Choice Based Credit System. University Grants Commission Bahadurshah Zafar Marg New Delhi. 110 002.
2. UGC (2008). From Chairman on Examination Reforms. D.O. No. F.1-2/2008(XI Plan), dated Jan 31, 2008: Annexure-II, Action Plan for Academic and Administrative Reforms.
3. UGC (2008) From Chairman, D.O. No.F.1-2/2008 (XI Plan). On Examination Reforms dated March 2009.